
परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
https://www.parlisangharshneta.in
9881265102 संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्ष- 11 वे | अंक क्र 72 | शनिवार दि. 28 मार्च 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060



# परळीत ना. पंकजाताई मुंडे यांचा हाऊसफुल्ल 'जनता दरबार

**➲ जनतेच्या समस्यांचा तात्काळ निपटारा ; प्रशासनाला दिल्या जागेवर सूचना**





परळी वैजनाथ दि. 27-- राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी परळी येथे 'जनता दरबार' आयोजित केला होता. या जनता दरबारात परळी मतदारसंघ व तालुक्यातील आलेल्या शेकडो नागरिकांच्या समस्या त्यांनी प्रत्यक्ष जाणून घेतल्या आणि अनेक प्रलंबित कामांना तात्काळ मार्गी लावले.

शासकीय विश्रामगृह येथे आयोजित या जनता दरबारात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केवळ अर्ज स्वीकारले नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगून जागेवर प्रश्नांचा निपटारा पान 3 वर

# नाथ्रा गावात साजरा होतो लेकींचा सप्ताह, सर्व जाती - धर्मातील लेकींचा सहभाग आदर्शवत!

**• तीन पिढ्यातील विविध जाती - धर्माच्या लेकींच्या सहयोगातून नाथ्रा गावातील सप्ताहाची सांगता; धनुभाऊ - पंकजाताई उपस्थित**





परळी (प्रतिनिधी) - नाथ्रा गावातील तीन पिढ्यातील हिंदू सह, मुस्लिम, दलीत आदी सर्व जाती - धर्मातील लेकींनी एकत्र येऊन आपल्या सर्वांच्या सहयोगातून आयोजित केलेला भागवत कथा व अखंड हरिनाम सप्ताह आज संपन्न आला. एकीकडे समाजात जाती - धर्मातील तेढ वाढवणाऱ्या घटना घडत असताना, एका गावातील सर्व जाती - धर्मातील लेकींनी एकत्र येऊन आयोजन केलेला हा सप्ताह आदर्शवत आहे.


या सप्ताहाचे हे दुसरे वर्ष होते. गावात राहणाऱ्या किंवा विवाहानंतर अन्यत्र स्थापित झालेल्या सर्व लेकींनी यासाठी वर्गणी दिली असून, काही कारणांनी ज्या लेकी सप्ताहास येऊ शकल्या नाहीत, त्यांनीही आपली वर्गणी पाठवली, हे विशेष!

या परंपरेला जपणाऱ्या गावातील सर्व बहिणींचे विशेष कौतुक व अभिनंदन करतो, असे गौरवोद्गार माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी नाथ्रा गावातील अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता समारंभात बोलताना काढले आहेत.

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, मंत्री पंकजाताई मुंडे यांचे जन्मगाव असलेल्या नाथ्रा या गावात गावातील सर्व कन्यांच्या सहयोगातून एकत्रित वर्गणी करून हा विशेष सप्ताह आयोजित करण्यात आला होता. यामध्ये हिंदू, मुस्लीम, दलीत आदी सर्वच कुटुंबातील कन्यांचा समावेश हे कौतुकास्पद व सामाजिक ऐक्याचा संदेश देणारे असल्याचे धनंजय मुंडे बोलताना म्हणाले. तसेच या सप्ताहासाठी पान 3 वर

# आज ठळक

## रुपाली चाकणकर यांचा राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा



भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणामुळे अडचणीत सापडलेल्या राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्याकडे चाकणकर यांनी राजीनामा सोपवला आहे. याआधी चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचाही राजीनामा दिला होता. त्यानंतर विरोधकांकडून त्यांच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या राजीनाम्याची मागणी केली जात होती. आता त्यांनी राजीनामा पक्ष नेतृत्वाकडे सोपवला आहे.रुपाली चाकणकर यांनी सोशल मीडियावर राजीनाम्याबाबत एक पोस्ट केली आहे. याबाबत त्यांनी म्हटले की, खरात प्रकरणाबाबत पहिल्या दिवशीच मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे. त्याच्या आर्थिक व्यवहारात, त्याच्या गैरकृत्यात दुरान्वये संबंध नाही, आजही तीच स्पष्ट व ठाम भूमिका आहे. तपासादरम्यान या सर्व बाबी निष्पन्न होतीलच. खोटे, असत्य व कुठलाही पुरावा नसताना जे आरोप माध्यमांमधून होत आहेत, ते वेदनादायक आहे. सत्य प्रखरतेने सिद्ध होईलच. हा तपास पारदर्शकपणे व निष्पक्षपणे व्हावा,ही माझी मागणी मी यापूर्वीच मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा. पोलिस महासंचालक यांच्याकडे केली आहे. आज सकाळी फोनद्वारे आदरणीय सुनेत्रावहिनी पवार यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार मी माझ्या राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देत आहे.अशोक खरात सध्या तपास यंत्रणांच्या ताब्यात आहे. त्याच्यावर महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. सध्या एसआयटीकडून त्याचा कसून तपास सुरु आहे. अशोक खरात प्रकरण समोर आल्यानंतर रुपाली चाकणकर यांचे काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. यात त्या अशोक खरातची पाद्यपूजा करत असल्याचे दिसत होते. त्यामुळे त्यांच्यावर टीका करण्यात येत होती. त्यामुळे त्यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. यानंतरतही त्यांच्यावर टीका सुरुच होती. आता अखेर त्यांनी राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे.

## परळीत एक दिवसीय विपश्यना शिबीराचे आयोजन

परळी / प्रतिनिधी-

परळी वैजनाथ येथे रविवार दि. 29 मार्च रोजी एक दिवसीय विपश्यना शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरात सहभागी होण्यासाठी साधकाने गोयंका गुरुजींच्या मार्गदर्शनात 10 दिवसीय शिबीर पुर्ण केलेले असणे आवश्यक आहे. बायस एन्टरप्रायजेस औद्योगकी वसाहत परळी येथे सकाळी 9 ते सायं. 4 पर्यंत हे शिबीर होणार आहे. तसेच दर रविवारी सकाळी 8 ते 9 यावेळेत साधना शिबीराचे आयोजन करण्यात येते. या सर्वांसाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. तरी या संधीचा लाभ महिला आणि पुरुष विपश्यना साधकांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी नरसिंग दौंड मोबा. 9158117108 व राधाकिशन धाटे-8805995640 यांच्याशी संपर्क साधावा.

# नाते सर्वधर्मसमभावाचे - ना. पंकजाताई मुंडे यांनी दिला एजाजभाई देशमुख यांच्या परिवाराला मदतीचा हात

**गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानकडून पाच लाखाची मदत ; मुस्लिम समाजातील गरीब मुलींच्या वैद्यकीय शिक्षणासाठी लावणार हातभार**



बीड दि. 27 -- राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा सर्व धर्मियांशी असलेला जिव्हाळा पुन्हा एकदा दिसून आला. भाजपचे दिवंगत नेते एजाजभाई देशमुख यांच्या निधनानंतर त्यांच्या परिवाराला गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या पाच लाख रूपयांची मदत त्यांनी जाहीर केली, एवढेच नव्हे तर मुस्लिम समाजातील दरवर्षी तीन गरीब मुलींना वैद्यकीय शिक्षणासाठी हातभार लावण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

भाजपच्या अल्पसंख्यांक मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष दिवंगत एजाज देशमुख यांचे नुकतेच निधन झाले, काल शहरात झालेल्या शोकसभेत ना. पंकजाताई मुंडे पान 3 वर

# नातेसंबंधाला काळिमा! 15 वर्षीय मुलाकडून अडीच वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार; परिसरात संतापाची लाट



अंबाजोगाई : मानवी जीवनाला काळिमा फासणारी अतिशय घृणास्पद व अतिशय निंदनीय घटना अंबाजोगाई तालुक्यातील डोंगर पिंपळा येथे घडली. या संदर्भातील माहिती अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी उघडकीस आणला आहे.

अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत डोंगर पिंपळा येथे अवघ्या दोन वर्षे पाच महिने वयाच्या चिमुरडीवर तिच्याच 15 वर्षीय वयाच्या नातेवाईकाने लैंगिक अत्याचार केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. धक्कादायक बाब म्हणजे मोबाईलवर अश्लील व्हिडिओ पाहून आरोपीने हे कृत्य केले असून, पीडितेचा मृत्यू झाल्यानंतर डॉक्टरांनी केलेल्या पान 3 वर

# भोंदू अशोक खरात प्रकरणात सुषमा अंधारे आक्रमक, थेट नाशिक पोलिस आयुक्तांच्या भेटीला..



नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात याचे एका मागून एक कारनामे पुढे येत आहेत. यादरम्यानच आता नाशिकच्या पोलिस आयुक्तांची भेट सुषमा अंधारे, रूपाली ठोंबरे आणि संगिता तिवारी यांनी घेतली आहे. या भेटीनंतर बोलताना सुषमा अंधारे यांनी म्हटले की, या प्रकरणात त्यांनी एफआयआर नोंदवून घेतली आहे. पण त्यांनी त्यांच्याकडे असलेली सर्व कागदपत्रे एसआयटीकडे वर्ग केली आहेत. आयओ देखील तिकडे गेले आहेत. या प्रकरणातील तपासाची जी काही गती आहे आणि आमचे जे प्रश्न आहेत, त्याचे उत्तरे ती सर्व एसआयटीसोबत पान 3 वर

# ना. पंकजाताई मुंडेंसह नाथऱ्यात लेकींच्या मांदियाळीत संपन्न झाला श्रीमद् देवी भागवत कथा सप्ताह

**सन्मान आणि अभिमानाने सर्व लेकी एकत्र आल्या ; इथल्या मातीत मोठी शक्ती**





परळी दि. 27 --- नाथऱ्याच्या मातीत मोठी शक्ती आहे. इथल्या मातीने विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे दिग्गज दिले आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासारखा लोकनेता नाथऱ्याने देशाला दिला. नाथऱ्याच्या लेकी आज सन्मानाने आणि अभिमानाने एकत्र आल्या आहेत. अध्यात्माची गोडी वाढवणारा हा सोहळा लेकींनी आयोजित करून एकजुटीची भावना वाढीस लावली असल्याचे राज्याच्या पान 3 वर

# काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आदित्य पाटील दिल्ली दरबारी; राष्ट्रीय अध्यक्ष खरगे यांच्याशी आगामी निवडणुकांबाबत सविस्तर चर्चा



प्रकाश मुंडे | केज तालुका प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. मल्लिकार्जुन खरगे यांची काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस मा. आदित्य दादा पाटील यांनी दिल्ली येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

या भेटीदरम्यान आदित्य पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन खरगे यांचे स्वागत केले. यावेळी उभय नेत्यांमध्ये महाराष्ट्रातील सध्याची राजकीय परिस्थिती, आगामी निवडणुकांचे सूक्ष्म नियोजन आणि पक्ष संघटना तळागाळापर्यंत अधिक मजबूत करणे या विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

**राज्यातील प्रश्नांवर वेधले लक्ष**

आदित्य पाटील यांनी केवळ राजकीय विषयांवरच नव्हे, तर महाराष्ट्रातील जनसामान्यांचे प्रश्न, शेतकरी आणि युवकांच्या पान 3 वर

# परळी वैजनाथ येथे रामनवमी निमित्त सुप्रसिद्ध गायक श्रीधर फडके यांचा गीत रामायण' भावस्पर्शी सुरेल सोहळा रंगणार

**वैद्यनाथ देवल कमिटीचा उपक्रम**




परळी वैजनाथ,(प्रतिनिधी) :- रामभक्तांच्या मनाला भक्तीभावाने भारावून टाकणारा आणि मराठी संस्कृतीचा अमूल्य ठेवा ठरलेला 'गीत रामायण' हा सुरेल सोहळा यंदाच्या रामनवमी निमित्ताने परळी वैजनाथ येथे रंगणार आहे. वैघनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित या विशेष कार्यक्रमामुळे भक्ती, संगीत आणि अध्यात्म यांचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ तमाम भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन वैद्यनाथ देवल कमेटीच्या वतीने करण्यात आले आहे. पान 3 वर

# परळी विधानसभा मतदारसंघाच्या एस.आय.आर. अभियानच्या बी. एल. ए. 1 विधानसभा प्रमुखपदी प्रा. पवन मुंडे

**ना. पंकजाताई मुंडे यांच्याकडून काम करणाऱ्या कार्यकर्त्यावर आणखी एक जबाबदारी**






परळी वैजनाथ (प्रतिनिधी) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश तर्फे मतदार याद्यांचे पुर्ननिरीक्षण म्हणजेच एसआयआर (SIR) अभियान सुरु आहे. या अभियानाकरिता BLA 1-विधानसभा प्रमुख म्हणून भाजपाचे युवक नेते, परळी पालिकेचे भाजपाचे गटनेते तथा बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी काम करणाऱ्या कार्यकर्त्याला जबाबदारी दिली असुन निवडीबद्दल प्रा. पवन मुंडे यांचे अभिनंदन केले जात आहे.

प्रा. पवन मुंडे हे गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय जनता पक्षाचे कार्य करीत आहेत. पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे, मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विविध उपक्रम राबविले आहेत. ना. पंकजाताई मुंडे यांच्या ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या "टर्निंग पॉईंट" च्या माध्यमातून शहरात विविध उपक्रम राबविले. त्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. परळी वैजनाथ नगर परिषदेत सलग दुसर्यांदा विक्रमी मताधिक्याने विजयी झाले आहेत. ना. पंकजाताई व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांचे अतिशय विश्वासू कार्यकर्ते अशी त्यांची ओळख आहे. भाजपामध्ये पान 3 वर

## ना. पंकजाताई मुंडे यांचा विश्वास सार्थ करू - प्रा. पवन मुंडे

ना. पंकजाताई मुंडे, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी आपल्यावर फार मोठा विश्वास टाकला असून हा विश्वास सार्थ करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे प्रा. पवन मुंडे यांनी सांगितले.

# अ‍ॅड.रवींद्र कानडे समाज भूषण पुरस्काराने सन्मानित.....



माजलगाव ( अनंत घडसिंगे ) : 22 मार्च 2026 रोजी तुळजापूर येथे लिंगायत महासंघ द्वारा आयोजित लिंगायत समाज अधिवेशनामध्ये माजलगाव शहरातील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट चे व्यवस्थापकीय संचालक अ‍ॅड.रवींद्र कानडे यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले....

श्री मंगलनाथ संस्थेला 25 वर्षे पूर्ण झालेली आहे या 25 वर्षाच्या कालावधीमध्ये सभासद व नागरिक यांच्या विश्वासास पात्र राहून कार्य करत समाजातील विविध दुर्बल घटकांना आर्थिक सहाय्य करून त्यांना आत्मनिर्भर आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे कार्य संस्थेच्या वतीने करण्यात आले त्याचबरोबर केवळ व्यवसायास प्राधान्य न देता सामाजिक बांधिलकी जपण्याचा उद्देश आखून सामाजिक,सांस्कृतिक व धार्मिक कार्यामध्ये नेहमीच अग्रेसर राहून समाज हिताची केलेल्या कार्याची दखल घेऊन लिंगायत महासंघाच्या वतीने त्यांना समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे...

त्यांच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून निश्चितच त्यांनी माजलगावचे नाव लौकिक केले आहे...सदरील कार्यक्रमात लिंगायत महासंघाचे प्रांताध्यक्ष श्री सुदर्शन बिरादार व प्रमुख उपस्थितीमध्ये धाराशिव जिल्ह्यातील महापौर, उपमहापौर, नगराध्यक्ष नगरसेवक,जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य उपस्थिती होते....सदरील कार्यक्रमास महाराष्ट्र राज्यातील हजारोच्या संख्येने समाज बांधव या कार्यक्रमास उपस्थित होते...

# प्रीपेड रिचार्ज योजनांद्वारा ग्राहकांची लूट : शासनाने लक्ष घालण्याची गरज

— डॉ. भारत कऱ्हाड



आजचा काळ हा डिजिटल युगाचा आहे. मोबाईल आणि इंटरनेट ही साधने आता केवळ संवादापुरती मर्यादित राहिलेली नाहीत, तर ती प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन जीवनाचा आधार बनली आहेत. शिक्षण, बँकिंग व्यवहार, शासकीय सेवा, आरोग्य सुविधा आणि व्यवसाय या सर्व क्षेत्रांमध्ये मोबाईलचा वापर अत्यावश्यक झाला आहे. त्यामुळे मोबाईल सेवा ही आता चैनीची बाब नसून जीवनाची गरज बनली आहे. अशा परिस्थितीत प्रीपेड रिचार्ज योजनांमधील त्रुटी आणि त्यातून होणारा ग्राहकांचा आर्थिक व सामाजिक तोटा हा गंभीर चिंतेचा विषय ठरत आहे.

अलीकडे खासदार सीए राघव चड्डा यांनी संसदेत या विषयावर ठोसपणे आवाज उठवला. त्यांनी इंटरनेटला "डिजिटल ऑक्सीजन" असे संबोधले आणि हा शब्दप्रयोग आजच्या वास्तवाशी पूर्णपणे सुसंगत आहे. कारण इंटरनेटशिवाय आज शिक्षण, व्यवहार, संपर्क आणि सेवा या सर्व गोष्टी अडथळ्यात येतात. इंटरनेट म्हणजेच आधुनिक जीवनाचा आधार बनला आहे आणि त्यामुळेच त्यास "डिजिटल ऑक्सीजन" असे म्हटले जाते.

प्रीपेड रिचार्ज योजनांमधील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 28 दिवसांची वैधता असलेली तथाकथित मासिक योजना. वरकरणी ही योजना साधी वाटत असली तरी तिच्यामागे एक स्पष्ट आर्थिक गणित दडलेले आहे. 28 × 13 = 364 या गणितानुसार वर्षात 12 महिन्यांऐवजी ग्राहकाला 13 वेळा रिचार्ज करावा लागतो. म्हणजेच ग्राहकावर एका अतिरिक्त रिचार्जचा आर्थिक भार टाकला जातो. "मासिक" हा शब्द वापरून ग्राहकांची दिशाभूल केली जाते आणि ही पद्धत पारदर्शकतेच्या विरोधात असल्याचे स्पष्ट दिसते.

याचबरोबर आणखी एक गंभीर समस्या म्हणजे रिचार्ज संपल्यानंतर संपर्क पूर्णपणे तुटणे. बाहेर जाणारे कॉल बंद होणे काही प्रमाणात समजण्यासारखे आहे; परंतु आत येणारे कॉल आणि आवश्यक संदेश बंद होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. आज मोबाईल क्रमांक हा बँक व्यवहार, आर्थिक देवाणघेवाण, शासकीय सेवा आणि नोकरी-व्यवसाय यांच्याशी जोडलेला आहे. अशा वेळी संपर्क खंडित होणे म्हणजे व्यक्तीला अडचणीत टाकणे होय. आपत्कालीन परिस्थितीत ही स्थिती अधिकच धोकादायक ठरते.

याशिवाय वापर न झालेल्या डेटाचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. अनेक योजनांमध्ये दररोज ठराविक डेटा दिला जातो; परंतु तो पूर्ण वापरला गेला नाही तर उरलेला डेटा वाया जातो. यामुळे ग्राहकाने पैसे भरले असतानाही त्याला पूर्ण सेवा मिळत नाही. ही बाब ग्राहकांच्या हिताच्या विरोधात आहे. त्यामुळे वापर न झालेला डेटा पुढील दिवसांसाठी उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते.

"डिजिटल ऑक्सीजन" ही संकल्पना या संपूर्ण चर्चेचा केंद्रबिंदू आहे. आज इंटरनेटशिवाय शिक्षण थांबते, आर्थिक व्यवहार अडतात, शासकीय सेवा मिळत नाहीत आणि सामाजिक संवाद खंडित होतो. त्यामुळे मोबाईल सेवा ही लक्झरी नसून जीवनावश्यक सेवा बनली आहे आणि तिच्या बाबतीत कोणताही अन्याय स्वीकारार्ह ठरू शकत नाही.

भारतातील दूरसंचार क्षेत्राचे नियमन ' रेग्युलेटरी ऑथॉरिटी ऑफ इंडिया' ही संस्था करते. ग्राहकांचे हित जपण्यासाठी या संस्थेकडून अधिक स्पष्ट, कठोर आणि ग्राहकाभिमुख नियमांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. रिचार्ज योजनांची वैधता 30 किंवा 31 दिवसांची असावी, रिचार्ज संपल्यानंतरही संपर्क येत राहण्याची सुविधा असावी, वापर न झालेल्या डेटाचा पुढील वापर करता यावा आणि योजनांची माहिती स्पष्ट व पारदर्शक पद्धतीने दिली जावी—या गोष्टी आज अत्यावश्यक बनल्या आहेत.

एकूणच पाहता, प्रीपेड रिचार्ज योजनांमधील त्रुटी ही केवळ आर्थिक समस्या नाही, तर ती ग्राहकांच्या हक्कांशी संबंधित व्यापक प्रश्न आहे. "डिजिटल ऑक्सीजन" ही संकल्पना आपल्याला सांगते की इंटरनेट हा आधुनिक जीवनाचा आधार आहे. त्यामुळे त्यात पारदर्शकता, न्याय आणि जबाबदारी असणे अत्यावश्यक आहे. ग्राहकाभिमुख धोरणे, प्रामाणिक सेवा आणि प्रभावी नियमन यांच्या माध्यमातूनच या समस्येवर योग्य तोडगा काढता येईल आणि डिजिटल व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल.

**डॉ. भारत कऱ्हाड**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय,**
**दापोली**
**जिल्हा रत्नागिरी**

# कीर्तनकार श्रीहरी महाराज पुरी यांच्या पत्नी आणि मुलाचा अपघातात होरपळून मृत्यू



केज/आष्टी/बीड : आष्टी तालुक्यातील अंमळनेर पोलिस ठाण्याच्या हद्दीत बीड अहिल्यानगर महामार्गावर कापसी फाट्याजवळ शुक्रवारी (दि.27) सकाळी 11 वाजता काळजाचा थरकाप उडवणारा अपघात झाला. एक हायवा टिप्पर आणि कार यांच्यात झालेल्या भीषण धडकेनंतर कारने अचानक पेट घेतला. या आगीत कीर्तनकार ह.भ.प. श्रीहरी महाराज पुरी यांची पत्नी आणि मुलगा यांचा जागीच होरपळून मृत्यू झाला. आग लागल्या नंतर दोघा माय-लेकरांनी कारमधून बाहेर पडण्याचा जीवाच्या आकांताने प्रयत्न केला. परंतु ते सर्व प्रयत्न निष्फळ ठरले.

आष्टी तालुक्यातील प्रसिद्ध कीर्तनकार आणि ग्रामपंचायत अधिकारी असलेले ह.भ.प. श्रीहरी महाराज पुरी (रा. साळेगाव ता. केज) यांची पत्नी सौ. पुष्पा श्रीहरी पुरी वय (47 वर्ष) आणि त्यांचा मुलगा ऋषिकेश श्रीहरी पुरी हे शुक्रवार, दि. 27 मार्च रोजी आष्टी येथून अहिल्यानगर-बीड या रस्त्याने त्यांची कार क्र. (एम एच-16/बी वाय-3839) बीड कडून बीडकडे जात होते. त्यांची कार धामणगाव पासून पुढे जात असताना कापशी फाट्या जवळ समोरून भरधाव वेगात येत असलेल्या हायवा टिप्पर क्र. (एम एच-16/सी डी-7305) ने जोराची धडक दिली.

हा अपघात एवढा भीषण होता की, अपघातात कारचा चकनाचूर झाला आणि कारने पेट घेतला. आग एवढी भीषण होती की, या आगीत कीर्तनकार ह.भ.प. श्रीहरी महाराज पुरी यांची पत्नी सौ. पुष्पा श्रीहरी पुरी वय (47 वर्ष) आणि त्यांचा सी ए असलेला मुलगा चि. ऋषिकेश श्रीहरी पुरी वय (28वर्ष) यांचा जागीच जळून कोळसा झाला. अपघातातील मयत आई आणि मुलांवर त्यांच्या मूळगावी साळेगाव ता. केज येथे अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. ज्यावेळी या मायलेकरांचा आगीत होरपळून मृत्यू झाला त्यावेळी हभप श्रीहरी महाराज पुरी यांचे कडा येथून जवळच असलेल्या केरुळ येथील अखंड सप्ताहात काल्याचे कीर्तन सुरु होते. कीर्तन सुरु असताना त्यांना अनेकांचे फोन आले म्हणून त्यांनी माईक बंद करून फोन उचलला आणि त्यांना ही दुर्दैवी बातमी समजली.

# एकादशी म्हणजे काय रे भौ???..

## ( 29 मार्च: कामदा एकादशी विशेष.)

कामदा एकादशी ही चैत्र शुक्ल पक्षातील एकादशी आहे. हिंदू नववर्षातील पहिली एकादशी म्हणजे कामदा एकादशी. या एकादशीचे व्रत केल्याने मनातील कामना पूर्ण होतात त्यामुळे मनःशांती लाभते. हिंदू धर्मामध्ये एकादशीला विशेष महत्त्व दिले जाते. एकादशीच्या दिवशी अनेक भक्त उपवास आणि पूजा करतात. कामदा एकादशी हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा उपवास मानला जातो. कामदा एकादशीचे व्रत चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशी तिथीला केले जाते आणि असे मानले जाते की हे व्रत पाळल्याने व्यक्तीचे सर्व पाप आणि दुःख दूर होतात. या व्रताचे काही महत्त्वाचे नियम आहेत, ज्यांचे पालन केल्याने शुभ फळे मिळतात. मान्यतेनुसार, कामदा एकादशीचे व्रत केल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात आणि पापांपासून मुक्तता मिळते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींच्या शब्दांत एकादशींचे विशेष महत्त्व अधोरेखित.... संपादक.

वारकरी संप्रदायामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील 11व्या तिथीला एकादशी म्हटले जाते. या दिवशी विष्णुभक्त तसेच विठ्ठलभक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसर्या दिवशी उपवास सोडला जातो. स्मार्त आणि भागवत एकादशी असे दोन भेद सांगितले आहे. ज्या पक्षात हे दोन भेद येतात. त्यावेळी पंचांगात पहिल्या दिवशी स्मार्त व दुसर्या दिवशी भागवत, असे लिहिलेले असते. अनेकदा एका पक्षात स्मार्त आणि भागवत, अशा एका पाठोपाठ दोन एकादशी असतात. यातील पहिल्या येणाऱ्या एकादशीला स्मार्त नाव असते. परंतु, भागवत एकादशीला नाव नसते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा कशा पद्धतीने करावी तसेच एकादशीचे नेमकं महत्त्व काय याविषयी जाणून घेऊयात...

पूजाविधी- वारकरी संप्रदायामध्ये परंपरेने भागवत एकादशी साजरी केली जाते. या एकादशीच्या दिवशी भगवान विष्णुंची पूजा करून विष्णू भक्त दिवसभर उपवास करतात. भागवत एकादशी व्रत हे पूर्ण नियम, श्रद्धा व विश्वासाने केले जाते. या व्रताच्या प्रभावामुळे मोक्ष प्राप्ती होते. या व्रतामुळे अश्वमेध यज्ञ, घोर तपस्या, तीर्थ स्नान व दान या सर्वांपासून मिळणाऱ्या पुण्यापेक्षाही जास्त पुण्य मिळते, असे पौराणिक कथेत म्हटले आहे.

महत्त्व- वारकरी संप्रदायामध्ये एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात 2 याप्रमाणे वर्षामध्ये 24 एकादशी येतात. यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा आणि आमलकी यांचा समावेश होतो. याशिवाय कृष्ण पक्षात पापमोचनी, वरुधिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाचा आश्रय करून राहतात. म्हणून जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो त्याला ती पापे लागतात. म्हणून एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णू प्रसन्न होतात.

विष्णुभक्तांसाठी एकादशी हे व्रत म्हणजे एक पर्वणीच असते. त्यामुळे ते नेमाने सर्व एकादशी करतात. ज्यांना उपास करणे शक्य नसते, ते भगवान विष्णूची पूजा करतात. तसेच साधा सात्त्विक आहार घेतात. "ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः||" या मंत्राचा जप करतात. अथवा विष्णुसहस्रनामाचे श्रवण-पठण करतात. मात्र जेव्हा एखादी तिथी विभागून येते आणि दिनदर्शिकेत दोन दिवसांवर एकाच तिथीचा दोनदा उल्लेख येतो तेव्हा काही भाविकांचा गोंधळ होतो. जसे की स्मार्त आणि भागवत एकादशी! मागील 9 डिसेंबर रोजी आलेल्या उत्पत्ती एकादशीला ही आणखी दोन नावे का? हा प्रश्न तुम्हालाही पडला असेल तर ही माहिती तुमच्यासाठी!

उत्पत्ती एकादशी: सर्व व्रतांमध्ये एकादशीच्या व्रताचे विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की या व्रताच्या प्रभावाने वर्तमानासह मागील जन्माची पापे नष्ट होतात. यासोबतच अनेक पिढ्यांतील पितरांना मोक्ष प्राप्त होतो. ज्यांना एकादशीचा उपवास सुरु करायचा आहे ते उत्पत्ती एकादशीपासून हे व्रत सुरु करू शकतात. या एकादशीच्या तिथीला देवीचा जन्म झाला म्हणून तिला उत्पन्ना तसेच उत्पत्ती एकादशी असेही म्हणतात. जाणून घेऊ एकादशीचे महत्त्व आणि कथा.

मग स्मार्त एकादशी म्हणजे काय? तर दशमी संपून एकादशी सुरु होताना त्या तिथीने सूर्योदय पाहिला नाही पण तो दिवस नव्या तिथीच्या नावे सुरु झाला असेल तर त्याला स्मार्त तसेच दर्श असा उल्लेख केला जातो. म्हणजे तिथी सुरु झाली पण तिथीशी संबंधित व्रत सूर्योदय पाहिलेल्या दिवशीच करायचे यासंबंधी ती सूचना असते. म्हणून ती स्मार्त एकादशी!

भागवत एकादशी: जी तिथी सूर्योदय पाहते ती तिथी आपल्याकडे ग्राह्य धरली जाते. म्हणजेच एकादशी तिथी आदल्या दिवशी सुरु झालेली असली तरी तिने जर दुसऱ्या दिवशीचा सूर्योदय पाहिला असेल तर ती तिथी पाळली जाते आणि दिनदर्शिकेवर देखील सूर्योदय पाहिलेल्या तिथीवर भागवत धर्माचे ध्वजचिन्ह दिसून येते. भागवत धर्म पाळणारे वारकरी बांधव त्यालाच भागवत एकादशी म्हणतात. वैष्णव उदय तिथी मानतात. स्मार्त वाले जिथून तिथी सुरु झाली ती तिथी मानतात आणि व्रत सुरु करतात. हा तो फरक.

स्मार्त म्हणजे जे लोक वेंदांवर, श्रुती स्मृती, पुराण यांना प्रमाण मानतात, ज्यांना वैदिक धर्माचं ज्ञान आहे, ते स्मार्त एकादशी पाळतात. थोडक्यात ऋषी, मुनी तसेच कर्मकांड करणारे योगी स्मार्त एकादशी करतात. तर वैष्णव म्हणजे जे विष्णू भक्त आहेत, संसारी आहेत, जे सूर्योदय पाहणारी तिथी ग्राह्य धरतात ते भागवत एकादशीचे व्रत करतात. म्हणून विष्णू भक्तांनी स्मार्त एकादशीला विष्णू पूजा करावी मात्र एकादशी व्रताचे पालन भागवत एकादशीला करावे, असे शास्त्र सांगते.

भगवान विष्णूंना प्रसन्न करण्यासाठी भागवत एकादशी व्रत केले जाते. वारकरी संप्रदायामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील 11व्या तिथीला एकादशी म्हटले जाते. या दिवशी विष्णुभक्त तसेच विठ्ठलभक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसर्या दिवशी उपवास सोडला जातो. एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात 2 याप्रमाणे वर्षामध्ये 24 एकादशी येतात. यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा व आमलकी यांचा समावेश होतो. याशिवाय कृष्ण पक्षात पापमोचनी, वरुधिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाचा आश्रय करून राहतात. म्हणून जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो त्याला ती पापे लागतात. म्हणून एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णू प्रसन्न होतात. अशी मान्यता आहे.

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**गडचिरोली,**
**फक्त व्हॉट्सअ‍ॅप- 9423714883.**

# "सोडूनिया गेली आई आम्हा लेकरांना, आई आई आता म्हणू मी कोणाला??"

15 मार्च 2026 ची रात्र आमच्यासाठी काळरात्र ठरली. रात्री 11.45 वाजता मला बोलत बोलतच अगदी ध्यानीमनी नसताना अचानक आईने माझ्या हातावर मान टाकली आणि आम्हाला पोरके करून निघून गेली. जोपर्यंत तिचे पाय सुस्थितीत होते तोपर्यंत दररोज सकाळी सहा वाजता वैद्यनाथाचे दर्शन घेऊन ती घरी परत येत असे. प्रभू वैद्यनाथाची निस्सीम भक्त असलेली आई ऐन एकादशीच्या दिवशी गेली.व प्रभु वैद्यनाथाच्या सोमवारीच तिने इहलोकीची यात्रा संपवली.

आई जेव्हा सोडून जाते तेव्हा घराच्या भिंती उभ्याच असतात पण घराचा आधार कोसळलेला असतो.तिचा आवाज थांबतो पण प्रत्येक कोपऱ्यात तिची आठवण बोलत राहते. स्वयंपाक घरात स्वयंपाक होतो पण अन्नाला चव राहत नाही.अंगणात तिच्या पाऊल खुणा असतात.

पण मायेची ऊब संपून जाते.

आई गेल्यावर कळते की ती फक्त एक माणूस नव्हती तर ती एक सवय होती, ती अपार सुरक्षिततेची खात्री होती. आजारी पडलो की प्रचंड काळजी करणारी, चुका केल्या तरी मोठ्या मनाने माफ करणारी आणि स्वतःच दुःख गिळून आपल्यासाठी हसणारी ती माऊली होती. तिच्या अनुपस्थितीत जगातील व्यवहार चालू राहतात पण मन स्तब्धपणे थांबते. लोक म्हणतात "वेळ" सगळं भरून काढते,पण आईच्या प्रेमाला उपमा नाही, आईची उणीव कोणीच भरून काढू शकत नाही. तिचं जाणं म्हणजे नात्याचं संपण नसतं तर आयुष्यभराची एक शांत पोकळी असते. जी कधीच भरून निघू शकत नाही. पाच सहा महिन्यापूर्वी सर्दी, खोकला, कफ झाल्याचे निमित्त झाले. सर्व अवयव नव्वदितले त्यामुळे क्षीण झालेल्या शरीराला तो आजार तिला परावलंबी करून गेला. तिला तिचेच स्वतः पाय उचलणे सुद्धा अशक्य झालं. तिच्या संवेदना कमी झाल्याने सगळे सोपस्कार ती कपड्यातच करु लागली. 'वृद्धत्वामुळे 'आलेली कमजोरी सोडून दुसरा कोणताही आजार तिला नव्हता. सल्ला मसलतीचा पाऊस पडला. लाख मोलाच्या आईसाठी काही हजारांची केअरटेकर??? मनाला हे पटेचना .अनेक पर्यायांचा उहापोह झाला .सौ राधा (माझी पत्नी) नोकरी वाली. मग मीच ठरवलं केअरटेकर आपणच व्हायचं." आईची आई" व्हायचं .नाही तरी सेवानिवृत्तीमुळे माझ्याकडे वेळच वेळ होता. सकाळी तिला उठवून लघवीची पिशवी रिकामी करणे, प्रात:विधी उरकणे, स्वतः तिचे दात घासणे, आम्ही उभयताने बाथरुम मध्ये उचलून नेऊन अंघोळ घालणं, अंगाला मलम लावणे, औषध गोळ्या देणं, डायपर बदलणं हा आमचा नित्यक्रम झाला. सकाळी चमच्याने पाजलेला चहा, फळांचा रस, राग राग करून भरवलेले काऊ चिऊचे घास .त्यातच कधी ठसका, तर कधी मळमळ, कधी उलटी तर कधी लहान लेकरासारखं तिचं गच्च तोंड बंद करून ठेवणे ,त्यामुळे आम्हा उभयंताची फार धावपळ होत होती. पण थकवा आला तरी जाणवत नव्हता. तिच्या प्रत्येक हाकेमुळे मनातल्या मनात कदाचित माझाही पान्हा फुटत असावा .मनाच्या कुठल्याही पातळीवर कधीही न मिळालेलं समाधान मी अनुभवत होतो .कुठल्याही कळा न सोसता मला तिचं "आई" पण मिळालं हे माझं किती मोठं भाग्य होतं .काही महिन्यांचीच सेवा झाली आणि एकादशीच्या पावन दिवशी माझ्या हिरकणीने गड सोडला.



मी माझं कर्तव्य समजून तिची सेवा केली .कुणीतरी म्हणालं "पुण्य कमावलंस" पण खरं सांगू? तिने आमच्यासाठी आयुष्यभर जे केलं त्यापुढे हे सर्व शून्यच.

देव आणि आई एकाच नाण्याच्या दोन बाजू ,देव खाली येऊ शकत नाही म्हणून त्याने आईला पृथ्वीवर पाठवलं ,असं कुठेतरी मी वाचलेलं होतं. त्या वाक्याचा प्रत्यय यावा अशीच माझी आई . रामची असो की शामची, कैकयीची असो की गांधारीची,आई सगळ्यांची सारखीच. शरीराने आणि मनाने आपल्या गूढ देवराईतील शक्ती देवता .फक्त आपल्या मुलांच्या भल्यासाठीच तिच्या ओंजळीतील माया रिकामी करणारी लक्ष्मीच ती. प्रत्येकाच्या छोट्याशा आकाशातील आढळ स्थानावरील ध्रुवतारा. तिचं गुरुत्वाकर्षण तर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणापेक्षाही भारी .खालून वर नेणार. बिजांडातून ब्रम्हांडात पोहोचवणार .तिच्या बिजांडात अंकुरलेला सूक्ष्म कोंब म्हणजे आपण. माता कुराणातील असो वा पुराणातील, तिचं वात्सल्य कुणालाही नतमस्तक व्हायला लावते. अनुसया असो की आदिती, दिगंबराची असो किंवा पैगंबराची, आई शेवटी आईच असते .प्रत्येक जन्माला आलेल्या बाळासाठी तिचं व त्याचं नातं अद्वैत . सर्वत्र फिरलो पण तिच्या उपकारांची परतफेड करणाऱ्या वस्तूंचा मॉल कधी मला दिसला नाही. डेबिट कार्ड ,क्रेडिट कार्ड ,पासबुक, एफडी ही या नात्यात फक्त कागद आहेत. आईचं कर्ज फेडण्या इतका त्यात बॅलेन्स कुठे आहे?

स्वतः अशिक्षित असूनही तिने तिची पाचही अपत्य एकापेक्षा एक सरस असेच घडवले.एक प्राध्यापिका, एक बँक अकाउंटंट, एक बँकेचा जनरल मॅनेजर, एक प्राचार्य, तर एक माध्यमिक शिक्षिका. आज तिची सहा नातवंड डॉक्टर आहेत, काहीं इंजिनीयर आहेत. आज तिच्या मायेचा वटवृक्ष फार मोठा बहरलेला आहे. तिच्या आजारपणात माझी लेक डॉ. ऋचा व जावई डॉ. सागर, आमचे भाऊजी श्री प्रभाकर दिक्कतवार व त्यांची मुले डॉ मेघमल्हार व डॉ श्रुती यांची झालेली वैद्यकीय मदत याचा उल्लेख केला नाही तर तो उपमर्द ठरेल. तिच्या आजारपणात माझ्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक सोपस्कार अगदी मनापासून न कंटाळता स्वतः ची आई समजून केलेल्या सेवेबद्दल माझी अर्धांगिनी सौ. राधा च्या सहकार्याला मनापासून सलाम... आईच्या ऋणातून किंचित मुक्त होण्याचा उतराई होण्याचा हा एक मार्ग... ..... आपणही शक्य असेल तेव्हा जरूर बना.. "आई ची आई"

**रमेश कोमावार, सेवानिवृत्त शिक्षक.**
**परळी वैजनाथ.**
**9422244882.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अ‍ॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

केला. जनतेचे प्रश्न सोडवणे हे माझे कर्तव्य आहे. सामान्यांची अडवणूक खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी अधिकाऱ्यांना दिला.

आपल्या लाडक्या नेत्या थेट जनतेत मिसळून संवाद साधत असल्याने उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण होते. 'ताईंनी आमचं म्हणणं ऐकून घेतलं आणि कामाचा शब्द दिला, आता आमचा प्रश्न सुटेल,' अशी भावना जनता दरबारात सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. या जनता दरबाराला स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होते.

---------------------------------------

गावात आलेल्या तीन पिढ्यातील सर्व लेकींचे आपण मनापासून स्वागत व अभिनंदन करतो, असेही ते म्हणाले. गावची कन्या म्हणून या सोहळ्यात सहभागी झाल्याचा विशेष आनंद असून, गावातील कन्या या कर्तबगार असल्याचे पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आवर्जून नमूद केले.पहिली पंगत महिलांची!अनेक सार्वजनिक कार्यक्रम, सप्ताह, विवाह सोहळे अशा ठिकाणी जेवणावळीच्या पंगतीला प्रथम प्राधान्य असते मात्र नाथरा गावातील या सप्ताहाच्या वेळी पहिल्या पंगतीचा मान हा महिलांना दिला गेला, हे विशेष!

---------------------------------------

यांनी एजाजभाई यांच्या कुटुंबियांच्या पाठिशी आपण खंबीरपणे उभे असल्याचे सांगत त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, एजाजभाई हे मुंडे साहेबांचे अत्यंत लाडके कार्यकर्ते होते. अल्पसंख्यांक आघाडीच्या माध्यमातून भारतीय जनता पक्षाच्या वाढीसाठी त्यांनी अविस्मरणीय योगदान दिले. अत्यंत शांत आणि सतत चेहऱ्यावर स्मितहास्य ठेवणारे तळमळीचे कार्यकर्ते अशी त्यांची ओळख निर्माण झाली होती. त्यांच्या जाण्याने आपण मुंडे साहेबांच्या शिकवणीवर चालणारा सक्रिय कार्यकर्ता गमावला आहे. एजाज या नावाचा अर्थ अद्भूत सन्मान असा होतो. त्यांच्या पश्चात त्यांच्या परिवाराला आधार देण्याची गरज ओळखून गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने पाच लाख रूपयांची मदत देते. याशिवाय मुस्लिम समाजातील गरीब, गरजू व वंचित मुलींना वैद्यकीय शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना त्यांनी जाहीर करून दरवर्षी तीन मुलींना यासाठी मदत करणार असल्याचे त्या म्हणाल्या. शोकसभेस राष्ट्रीय नेते जमाल सिद्दिकी, आ. संजय केणेकर, योगेश क्षीरसागर, सलीम जहांगीर, वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, इद्रीस मुलतानी आदींसह असंख्य मुस्लिम बांधव उपस्थित होते.

---------------------------------------

शवविच्छेदनातून हा प्रकार उघड झाला आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील डोंगर पिंपळा येथील ही चिमुरडी 17 मार्च 2026 रोजी घरासमोरील पाण्याच्या हौदात पडून मयत झाली होती. सुरुवातीला हा केवळ अपघात वाटत असल्याने अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयातील डॉक्टरांनी शवविच्छेदन करताना मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार निदर्शनास आणून दिला. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने सखोल तपास सुरु केला.तपासादरम्यान पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले आणि त्यांच्या पथकाने अत्यंत गोपनीयरीत्या माहिती गोळा केली. पीडितेच्या मृत्यूनंतर संशयित आरोपी असलेला तिच्या आत्याचा मुलगा (वय 15 वर्षे 5 महिने) हा तीन दिवस जेवला नव्हता आणि सतत रडत होता, अशी माहिती पोलिसांना गुप्त बातमीदारांकडून मिळाली. या संशयावरून पोलिसांनी त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पीडितेच्या मृत्यूपूर्वी आठ दिवस अगोदर आरोपीने तिला चॉकलेटचे आमिष दाखवून आपल्या दुचाकीवर बसवून नेले आणि घरात कोणी नसताना मोबाईलवरील अश्लील चित्रफीत पाहून तिच्यावर अत्याचार केले. त्यापूर्वी देखील त्याने तिच्यावर एक वेळेस अत्याचार केल्याची कबुली दिली.या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 64(1) आणि बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) अधिनियम 2012 च्या कलम 4, 6, 8 आणि 12 नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी स्वतः सरकारतर्फे फिर्यादी होऊन एका गुंतागुंतीच्या गुन्ह्याचा छडा लावला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पिंक पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जाधवर यांच्याकडे सोपवण्यात आला असून, या घटनेने संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

---------------------------------------

चर्चा केल्यानंतर मिळू शकतात, त्यामुळे कदाचित मी तुम्हाला इतके काही ठोस सांगू शकत नाही, असे पोलिस आयुक्तांनी सांगितले. सध्या आमचे त्यांच्यासोबत अत्यंत प्राथमिक बोलले झालेले आहे. तपास सगळा एसआयटीकडे वर्ग करण्यात आला आहे, त्यामुळे त्यांना त्यावर काहीही भाष्य करता येणार नाहीये. ते अगोदर एसआयटीसोबत चर्चा करतील आणि त्यानंतर ते उत्तरे देऊ शकतातआता पुन्हा एकदा सुषमा अंधारे या प्रकरणात आक्रमक भूमिका घेताना दिसत आहेत. सुषमा अंधारे यांनी म्हटले की, आम्ही लवकरच एसआयटी पथकाची भेट घेणार आहोत. चाकणकर यांना अटक करण्यासाठी पोलिस आयुक्तांना निवेदनही देण्यात आले. भोंदू अशोक खरात प्रकरणात सातत्याने रुपाली चाकणकर यांचे नाव घेत आहे..रुपाली चाकणकर भोंदू अशोक खरात याचे पाय धुताना देखील दिसल्या होत्या, त्यांच्या या व्हायरल व्हिडीओनंतर राज्यात खळबळ उडाली आणि त्यांच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने केली जात होती. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडे आपला राज्य महिला आयोग अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

---------------------------------------

पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितले.

नाथरा येथे विविध गावात सासरी गेलेल्या लेकींनी एकत्रित येऊन श्रीमद् देवी भागवत कथा सप्ताह आयोजित केला होता. कथेच्या सांगता सोहळ्यास ना. पंकजाताई मुंडे आणि आ. धनंजय मुंडे उपस्थित होते. याप्रसंगी स्वररत्न ह.भ.प अंजलीताई केंद्रे यांच्या सुमधुर वाणीतून काल्याचे कीर्तन संपन्न झाले, ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे श्रवण करून उपस्थित भाविकांशी संवाद साधला.

श्रीमद देवी कथेला लेकींचा विशेष मान असतो, आज कथेच्या निमित्ताने नाथऱ्याच्या लेकी सन्मानाने आणि अभिमानाने इथे एकत्र आल्या आहेत. लेकींचा सन्मान करण्याची आपली संस्कृती यानिमित्ताने वृद्धिंगत होईल, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देखील चैत्र नवरात्रेनिमित्त कन्या पूजन करतात. मध्य प्रदेश मध्ये शिवराजसिंह चौहान अत्यंत आदरपूर्वक लेकींचे कन्या पूजन करतात, यातून लेकींचा सन्मान होतो असे पंकजाताई मुंडे म्हणाल्या. आज या कथेच्या माध्यमातून अत्यंत सुंदर सोहळा पार पडतो आहे. यानिमित्ताने मला सर्वांशी संवाद साधता आला. नाथऱ्याच्या मातीत मोठी शक्ती आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब, पंडित अण्णा मुंडे, धनंजय मुंडे,डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासारखे दिग्गज नेते आपल्या नाथऱ्याने दिले असल्याचे त्या म्हणाल्या. अध्यात्म आणि एकजुटीची भावना वाढीस लावणारा हा सोहळा होता, आयोजक लेकींचे मनापासून आभार मानत ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्वांचे यश, कीर्ती आणि आरोग्यासाठी प्रार्थना करते म्हणतं त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. सांगता सोहळ्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्व महिला भगिनींसोबत पंगतीत बसून महाप्रसादाचा लाभ घेतला.

---------------------------------------

समस्यांबाबतही खरगे यांच्याशी संवाद साधला. राज्यातील आगामी राजकीय आव्हाने पेलण्यासाठी आणि काँग्रेसचा विचार घराघरात पोहोचवण्यासाठी पक्षश्रेष्ठींचे पाठबळ व मार्गदर्शन प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

या भेटीमुळे आगामी काळात राज्यातील पक्ष संघटनेत नवीन ऊर्जा पाहायला मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे

---------------------------------------

मराठी साहित्यातील दिग्गज कवी ग. दि. माडगुळकर यांच्या अप्रतिम शब्दांना आणि सुप्रसिद्ध संगीतकार सुधीर फडके (बाबूजी) यांच्या सुरेल संगीताला लाभलेले 'गीत रामायण' आजही रसिकांच्या मनात घर करून आहे. या अजरामर कलाकृतीला सुप्रसिद्ध गायक श्रीधर फडके यांच्या सुमधूर आवाजातून नवसंजीवनी मिळणार आहे.

रविवार, दि. 29 मार्च 2026 रोजी सायंकाळी 6 वाजता श्री वैजनाथ मंदिराच्या पायथ्याशी (उत्तर बाजू परिसर) हा कार्यक्रम सादर होणार आहे. या कार्यक्रमात रामायणातील विविध प्रसंग सुरेल गीतांच्या माध्यमातून सादर होणार असून, उपस्थितांना भक्तीमय वातावरणात एक वेगळीच आध्यात्मिक अनुभूती लाभणार आहे.

या कार्यक्रमासाठी वैजनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा परळीचे तहसीलदार श्री. विनोद सुभाषराव रणवरे, वैद्यनाथ देवन कमिटीचे सेक्रेटरी श्री. बाबासाहेब वामनराव देशमुख तसेच सर्व विश्वस्तांनी, भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल मेजवानीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

रामनवमीच्या पावन पर्वावर आयोजित हा 'गीत रामायण' सोहळा परळीकरांसाठी निश्चितच एक संस्मरणीय सांस्कृतिक पर्व ठरणार आहे.

---------------------------------------

त्यांनी विविध पदांवर काम केले असुन भाजपा युवा मोर्चामध्येही काम केले आहे. सध्या भाजपाचे शहर उपाध्यक्ष तसेच नगरपरिषदेत भाजपाचे गटनेते म्हणून काम करीत आहेत.

नगरपालिकेच्या माध्यमातून आणि भाजपच्या सहकार्याने प्रा. पवन मुंडे यांनी शहरात अनेक कार्यक्रम राबविले आहेत. या सर्व कार्याची दखल घेऊनच नामदार पंकजाताई मुंडे यांनी प्रा. पवन मुंडे यांच्यावर मोठी जबाबदारी दिली आहे. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश तर्फे मतदार याद्यांचे पुर्नर्निरीक्षण म्हणजेच एसआयआर (SIR) अभियान सुरु आहे. या अभियानाकरिता BLA 1-विध आपण विधानसभा क्षेत्रातील मतदार याद्यांच्या पुर्ननिरीक्षण कामास वेळ देऊन आपल्या अनुभवाचा योग्य उपयोग कराल असा विश्वास व्यक्त केला. जिल्हाध्यक्ष, आमदार व पदाधिकारी यांच्याशी चर्चा करुन BLA-2 च्या प्रत्येक बूथवर नियुक्त्या कराव्यात व त्याची माहिती प्रदेशास द्यावी अशा सूचना दिल्या आहेत. दरम्यान या निवडीबद्दल प्रा. पवन मुंडे यांचे अभिनंदन केले जात आहे.

---------------------------------------

## पान 4 वरुन

शास्त्री महाराज यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक भक्त यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, गोपीनाथ मुंडे या नावाच्या संस्कारावर किती विश्वास आहे. लोकसभेत पराभव झाल्यानंतर माझ्या भावांनी आत्महत्या केल्या, इतकं प्रेम तुम्ही मला दिलं. माझ्या कातड्याचे जोडे केले आणि तुमच्या पायात घातले तरीही परतफेड होणार नाही. लोकनेते गोपीनाथ मुंडे हे नाव जगाला विसरु देणार नाही, मी ही शपथ चितेवर खाल्ली आहे. त्यामुळे वंचित, उपेक्षित घटकांच्या कल्याणासाठी आयुष्यभर आपण काम करत राहील. जनतेचे आपल्याला भरपूर प्रेम मिळालेले आहे. हे नातं जगातलं विलक्षण अशा प्रकारचे नाते आहे.गोपीनाथ मुंडे होणं सोपी गोष्ट नाही, त्यासाठी मखमली रस्त्यावरची वाटचाल नाही तर काटेरी खडतर मार्गाने राबराब राबणे आवश्यक असते. जनता जनार्दन मला इतके प्रेम देते की, माझ्या कातड्याचे जोडे करून जरी घातले तरी ते ऋण फिटणार नाही. त्यामुळे मला सातत्याने या प्रेमाला मी कसे उतराई होऊ असा प्रश्न पडत आलेला आहे. मुंडे साहेबांचा विचार आणि वारसा जपत वाटचाल करत असताना मनात कोणताही स्वार्थ न ठेवता श्वासात श्वास असेपर्यंत या वंचित उपेक्षित घटकांचे कल्याण कसे होईल यासाठी मी रात्रंदिवस प्रयत्न करत आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांमुळेच मी आज इथपर्यंत आहोत. समाजातील वंचित, अपेक्षित घटकांचे जीवन कष्टमुक्त व्हावे यासाठी मुंडे साहेबांनी आयुष्यभर काम केले, त्याच मार्गावरुन मुंडे साहेबांना अपेक्षित कार्य करून जनतेच्या या निरपेक्ष प्रेमातून उतराई होण्याचा आपण प्रयत्न करु असे सांगत सगळे प्रेमाने राहा एकजुटीने राहा एकमेकांचा हात धरून रहा, असे आवाहन उपस्थित भाविकांना केले.

---------------------------------------

टोकांच्या संकटांचा सामना करत आहे. या भागातील शेतकऱ्याला केवळ मदतीची नाही, तर शाश्वत उपायांची गरज आहे," असे त्यांनी ठामपणे मांडले.प्रमुख मागण्या आणि उपाययोजना:राज्यसभेत बोलताना रजनीताई पाटील यांनी मराठवाड्यासाठी महत्त्वाच्या तांत्रिक आणि संशोधनात्मक उपाययोजनांची मागणी केली:CRIDA प्रादेशिक केंद्राची स्थापना: हैदराबादच्या धर्तीवर मराठवाड्यात केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था (CRIDA) चे एक विशिष्ट प्रादेशिक केंद्र स्थापन करावे, जेणेकरून स्थानिक हवामानानुसार शेती संशोधन होईल.कोरडवाहू शेती प्रकल्पाला गती: मराठवाडा आणि विदर्भातील 'अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पा'चे (AICRPDA) काम गतीने पुढे नेणे आवश्यक आहे.हवामान बदलाचा अभ्यास: बदलत्या हवामानानुसार पिकांचे नियोजन करण्यासाठी शेतकऱ्यांना तांत्रिक पाठबळ मिळायला हवे."शेतकरी हा या देशाचा कणा आहे, जर तोच सुरक्षित नसेल तर देशाची प्रगती कशी होणार? मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी तातडीने शाश्वत धोरणे आखण्याची वेळ आली आहे."— खा. रजनीताई पाटील (राज्यसभा खासदार)या भाषणाद्वारे त्यांनी मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना राष्ट्रीय स्तरावर वाचा फोडली असून, सरकार आता यावर काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---------------------------------------

निवडणुकीत मोठी चुरस निर्माण होणार हे मात्र नक्की.

बड्या नेत्यांच्या गटात होणार 'काटे की टक्कर'यावेळी केज नगरपंचायतीची निवडणूक केवळ स्थानिक मुद्द्यांवर नाही, तर दिग्गज नेत्यांच्या प्रतिष्ठेची ठरणार आहे. प्रामुख्याने खालील गटांमध्ये जोरदार संघर्ष पाहायला मिळेल:आडसकर गट (रमेश आडसकर यांच्या नेतृत्वाखाली)आ.मुंदडा गटखा.बजरंग बप्पा सोनवणे गट,खा.रजनीताई पाटील गट,हारुण भाई इनामदार गट,पशुपतीनाथ दांगट पाटील,अंकुश अण्णा इंगळे या दिग्गज गटांसोबतच अनेक अपक्ष उमेदवार आणि छोट्या-मोठ्या स्थानिक आघाड्यांनीही कंबर कसली असून, ते कुणाचे गणित बिघडवतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.'किंगमेकर' कोणाच्या बाजूने?मोठ्या गटांशिवाय केजमधील काही ठराविक नेत्यांच्या भूमिकेकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. यामध्ये:सौ. सिताताई बनसोड,कपिल मस्के,दलित पँथरचे कार्यकर्तेया नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची भूमिका कोणाच्या बाजूने झुकते, यावर केज नगरपंचायतीची सत्ता कोणाच्या हाती जाणार याचे भवितव्य अवलंबून असेल. सद्यस्थितीत केजचे राजकीय वातावरण पूर्णपणे ढवळून निघाले असून, आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी आणि रणनीती आखण्याला वेग आला आहे.केज शहरात ओबीसी समाज मोठ्या प्रमाणात असून निर्णायक आहे तो जिकडे वळेल त्याचा विजय निश्चित होणार आहे.

---------------------------------------

आणि पर्यवेक्षक म्हणून चि. शोएब पठाण यांनी आपल्या जबाबदाऱ्या अत्यंत आत्मविश्वासाने पार पाडल्या. शिक्षक, शिस्त प्रमुख अशा विविध भूमिकांमध्ये विद्यार्थ्यांनी ज्या समर्पणाने काम केले, ते पाहून प्रत्येकाच्या मनात अभिमानाची भावना निर्माण झालीसकाळच्या प्रार्थनेपासूनच दिवसाची सुरुवात एका वेगळ्या उर्जेने झाली. प्रार्थना, प्रतिज्ञा, सुविचार आणि बातम्या सादर करताना विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, स्पष्ट उच्चार आणि सादरीकरणाची शैली सर्वांना भावली. त्या क्षणी प्रत्येक विद्यार्थी स्वतःला एक जबाबदार नागरिक म्हणून घडवताना दिसत होता. वर्गातील अध्यापन हा या दिवसाचा सर्वात भावनिक आणि अभिमानास्पद भाग ठरला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावताना केवळ विषय शिकवला नाही, तर शिकवण्यामागची जबाबदारीही अनुभवली. फळ्यावर आकृत्या काढताना, उदाहरणे देताना आणि प्रश्न विचारताना त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आत्मविश्वास आणि आनंद खरोखरच प्रेरणादायी होता. काही क्षण असे होते की, जिथे शिक्षकांनाही विद्यार्थ्यांकडून शिकत असल्याची जाणीव झाली शिस्त, वेळेचे पालन आणि स्वच्छता या बाबतीत विद्यार्थ्यांनी दिलेले उदाहरण कौतुकास्पद ठरले. संपूर्ण शाळा एका सुरळीत यंत्रणेप्रमाणे चालताना दिसत होती. शिस्त प्रमुख म्हणून काम करणाऱ्या विद्यार्थ्यांनी अत्यंत संयमाने आणि जबाबदारीने अनुशासन राखले या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनात "नेतृत्व म्हणजे इतरांवर अधिकार गाजवणे नव्हे, तर त्यांना योग्य मार्गदर्शन करून एकत्र पुढे नेणे" हा अमूल्य संदेश खोलवर रुजला. संवादकौशल्य, निर्णयक्षमता आणि सहकार्याची भावना यांचा सुंदर संगम या दिवशी अनुभवायला मिळाला शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नांचे मनापासून कौतुक करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. पालकांनीही या उपक्रमाचे स्वागत करत, "आज आमची मुले केवळ शिकत नाहीत, तर जबाबदार जीवन जगण्याची तयारी करत आहेत," अशी भावना व्यक्त केली यावेळी सचिव श्री. दीपक तांदळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आपल्या प्रेरणादायी भाषणात ते म्हणाले, "आजचा स्वयंशासन दिन तुम्ही ज्या शिस्तीत, आत्मविश्वासाने आणि जबाबदारीने पार पाडला, त्याबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन! आज तुम्ही केवळ भूमिका साकारल्या नाहीत, तर प्रत्येक जबाबदारीची खरी जाणीव अनुभवली. शिक्षक म्हणून उभे राहताना आणि शाळा चालवताना तुम्हाला आलेले अनुभव आयुष्यभर उपयोगी पडतील. नेतृत्व म्हणजे केवळ आदेश देणे नव्हे, तर इतरांना समजून घेऊन योग्य मार्गदर्शन करणे — हे तुम्ही आज कृतीतून दाखवून दिले. काही ठिकाणी चुका झाल्या असतील, पण त्यातून शिकणे हीच खरी प्रगती आहे. आजचा हा अनुभव तुमच्या आयुष्यात आत्मविश्वास वाढवणारा आणि जबाबदारीची जाणीव अधिक मजबूत करणारा ठरेल. तुमच्यात खूप क्षमता आहे; फक्त सातत्य, शिस्त आणि प्रामाणिकपणा जपा. आजचा स्वयंशासन दिन तुमच्या उज्ज्वल भविष्याची सुरुवात ठरो, हीच अपेक्षा!"

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव व्यक्त करताना अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. "आज आम्हाला शिक्षकांची खरी किंमत समजली," असे म्हणताना त्यांच्या आवाजात जाणवणारी प्रामाणिकता हा या दिवसाचा सर्वात मोठा ठेवा ठरला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे, सचिव श्री. दीपक तांदळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनकाडे सर, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. माधुरीताई तांदळे, प्रभारी मुख्याध्यापक श्री. गायकवाड सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले. एकूणच, संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभाग येथे साजरा झालेला हा स्वयंशासन दिन म्हणजे शिस्त, जबाबदारी, आत्मविश्वास आणि नेतृत्व यांचा हृदयस्पर्शी उत्सव ठरला."आजचा विद्यार्थीच उद्याचा सक्षम, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक" — या विचाराला साजेसा असा हा उपक्रम खरोखरच प्रत्येकाच्या मनात कायमचा घर करून गेला.

---------------------------------------

उलगडून सांगितली. रामराज्य म्हणजे केवळ ऐतिहासिक कल्पना नसून प्रत्येकाच्या जीवनात साकार होणारी मूल्यव्यवस्था आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. ज्या घरात सुख, शांती, समाधान आणि समृद्धी नांदते, जिथे प्रेम, आदर आणि परस्परांतील स्नेह जपला जातो, तेथेच खरे रामराज्य अवतरते. प्रत्येकाने आपल्या आचरणात सकारात्मक बदल घडवून आणत सद्विचार, सदाचार आणि नामस्मरण यांचा अवलंब केल्यास समाजातही रामराज्याची अनुभूती निर्माण होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.तसेच यावेळी बोलताना त्यांनी साधू-संतांचे विचार जीवनात अंगीकारण्याचे महत्त्व अधोरेखित केले. काळाच्या ओघात समाज झपाट्याने बदलत असून अनेक चांगल्या गोष्टींसोबतच नकारात्मक प्रवृत्तीही वाढताना दिसतात. दररोज विविध वाईट व अंधश्रद्धेच्या गोष्टी कानावर पडत असताना विवेकबुद्धी जागृत ठेवून अशा गोष्टींपासून दूर राहणे आवश्यक आहे. सत्कर्म, नामस्मरण आणि भगवंतावर दृढ श्रद्धा ठेवून जीवन जगल्यास प्रत्येक संकटावर मात करता येते, कारण भगवंत कायम आपल्या सोबत असतो, असा संदेश त्यांनी दिला. यावेळी धर्मापुरीसह परिसरातील भाविक व भजनी मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------------------------------

शिनगारे लाभले होते तर प्रमुख पाहुणे म्हणून से.नि. शिक्षण अधिकारी सखाराम उजगरे,प्राध्यापक डॉ .शिवाजीराव दिवाण, से.नी उपनिबंधक सहकार ॲड हनुमंत कांबळे मुख्याध्यापक वैशाली शिंदे, बौद्धाचार्य ॲड भास्करराव सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. विचार मंचावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी. एम भोले, वाचाल तर वाचाल चे अध्यक्ष डी. जी वानखेडे यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेला पुष्प तर सम्राट अशोक छत्रपती,शिवाजी महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पदीप धुपाने पूजन मान्यवरांच्या हस्ते करून विनम्र अभिवादन करण्यात आले व सामुदायिक त्रिसरण पंचशील ग्रहण करण्यात आले कार्यक्रमाचे अवचित्य साधून सुप्रसिद्ध लेखिका, कवियत्री यांना नुकताच नालंदा फाउंडेशन पुणे तर्फे राज्यस्तरीय कर्तुत्व गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.तसेच बौद्धाचार्य पदवी प्राप्त केल्याबद्दल ॲड.भास्कर सोनवणे यांचा देखील महामानव अभिवादन ग्रुप व धम्मदीप बुद्ध विहारा तर्फे पुष्पगुच्छ व धम्मपद हा ग्रंथ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना माया दिवाण म्हणाल्या की सर्वच आदर्श महापुरुषांची जीवन चरित्रांचा सखोल अभ्यास करून त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जीवन जगल्यास आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो व पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करून ज्येष्ठांच्या कडून पाठीवरील कौतुकाची थाप पुढील कार्य करण्यास बळ देते व तथागतांच्या अंधारातून प्रकाशाकडे - प्रकाशाकडून अतिउच्च प्रकाशाकडे जाण्यास मदत होते असे भावोद्गार काढले.स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार करून स्वतः सम्राट अशोकाने तथागताने सांगितलेल्या मानवाच्या कल्याणाच्या मार्गाचा प्रसार व प्रचार करण्याकरिता आपला पुत्र महेंद्र व कन्या संघमित्रा ला सिलोन (श्रीलंका)ला पाठवले हा सम्राट अशोकांचा त्याग सर्वांसाठी आदर्शवत आहे. कार्यक्रम प्रसंगी आयु.ॲड. हनुमंत कांबळे यांनी देखील सम्राट अशोकांच्या दैदिप्यमान जीवन पटावर सखोल प्रकाश टाकून सम्राट अशोकाचे कार्य सर्वांसमोर ठेवणे आजच्या काळात कसे गरजेचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे उपस्थितांना समजावून सांगून विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जी एम भोले यांनी केले तर आभार प्रदर्शन ॲड. तेजस वडमारे यांनी केले कार्यक्रमास अंजली वडमारे, सरिता खेमाडे, अर्चना जाधव,आशाबाई भालेराव, क्रांती धनवे, मालणबाई अंकुटे रमाबाई सोनवणे, पी. वाय घोडेराव, बि.डी तांगडे, बी.जी दळवी,सुनील समुद्रे, दिलीप गवळी, व महामानव अभिवादन ग्रुपचे बहुसंख्य सदस्य व धम्मदीप महिला मंडळाच्या बहुसंख्य महिलांची उपस्थिती होती. सरणात्तयने कार्यक्रमाची सांगता झाली.

---------------------------------------

डोळ्यादेखत मातीत जात असून, शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. या अस्मानी आणि सुलतानी संकटामुळे शेतकरी आत्महत्या करत असून ही बाब अत्यंत गंभीर आणि वेदनादायक असल्याचे त्यांनी नमूद केले. बीड जिल्ह्यातील दुष्काळावर तोडगा काढण्यासाठी बाहेरुन जिल्ह्यात पाणी आणल्याशिवाय पर्याय नाही. बीड जिल्ह्याला कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करण्यासाठी उजनीचे पाणी मांजरा धरणात आणणे हाच एकमेव पर्याय असल्याचे सोनवणे यांनी ठामपणे सांगितले. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास बीडच्या शेतकऱ्यांसाठी ते 'जीवनदायी' ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

---------------------------------------

कारला समोरुन जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, कारच्या इंजिनने तात्काळ पेट घेतलाकारने पेट घेतल्याने आत असलेल्या मुलाला आणि आईला दरवाजा उघडून वेळीच बाहेर पडता आले नाही. बघता बघता आगीने रौद्र रूप धारण केले आणि मदतीसाठी लोक धावण्यापूर्वीच दोन्ही प्रवाशांचा कारमध्येच होरपळून मृत्यू झाला. या घटनेमुळे महामार्गावर मोठी गर्दी झाली असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा सुरु केला आहे.

---------------------------------------

विभागाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. संजय साळुंखे यांनी माहिती-तंत्रज्ञानाचा योग्य आणि सुरक्षित वापर विद्यार्थ्यांनी करावा, मोबाईल, गुगल व विविध वेबसाईट्सचा वापर करताना आवश्यक खबरदारी घ्यावी यासाठीच या कार्यशाळेचे आयोजन केल्याचे सांगितले.प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात मोबाईल वापरताना सायबर हॅकिंगपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स जसे की इंस्टाग्राम व व्हॉट्सॲप खाते सुरक्षित ठेवणे, तसेच माहिती-तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.प्रमुख व्याख्याते प्रा. भार्गव चौधरी यांनी सायबर सुरक्षेचे महत्त्व स्पष्ट करताना ऑनलाइन जगात सुरक्षिततेसाठी कोणती काळजी घ्यावी याचे सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी वैयक्तिक व आर्थिक माहिती सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व सांगितले तसेच ओटीपी कोणालाही शेअर करू नये, पासवर्ड मजबूत ठेवावा, याबाबत विद्यार्थ्यांना जागरूक केले.त्यांनी विविध शासकीय योजनांमधील डिजिटल वापर, तसेच सायबर गुन्ह्यांचे धोके यावरही प्रकाश टाकला. कॉसमॉस बँक हॅकिंग प्रकरण (2018) आणि एअर इंडिया डेटा लीक (2021) यांसारख्या घटनांचा संदर्भ देत त्यांनी सायबर सुरक्षेबाबत सजग राहण्याचे आवाहन केले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांशी अनौपचारिक संवाद साधत त्यांनी त्यांच्या शंकांचे निरसनही केले. या कार्यशाळेला विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा शेळके यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. अशोकराव पवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. विठ्ठल तंबूड, प्रा. शेंडगे, प्रा. मरळकर, प्रा. डॉ. प्रवीण पाटील, डॉ. सत्यजित मस्के आदींनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------------------------------

परिषद परळी वैजनाथ कार्यालयात जाऊन निवेदन सादर केले असून, तसेच जिल्हा प्रशासन व राज्यातील मान्यवरांना ईमेलद्वारे निवेदन पाठवून तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.सदर निवेदनाची प्रत मा. जिल्हाधिकारी, बीड, मा. उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, मा. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे तसेच मा. आमदार धनंजय मुंडे यांना पाठविण्यात आली आहे.निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, सोमवार हा भगवान शंकराचा पवित्र दिवस असून त्या दिवशी भाविक उपवास, पूजन व धार्मिक आचरण करतात. अशा वेळी मांस विक्री सुरु राहणे ही बाब जनभावनेला ठेच पोहोचवणारी असून परळी वैजनाथच्या पवित्रतेला बाधा आणणारी आहे.या पार्श्वभूमीवर श्री. केदारी यांनी प्रशासनाकडे प्रत्येक सोमवारी मांस विक्री, कत्तल, वाहतूक व सेवनावर पूर्ण बंदी लागू करावी, नगर परिषदेमार्फत याबाबत अधिकृत ठराव मंजूर करावा तसेच आदेशाची कडक अंमलबजावणी करून उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.दरम्यान, नगर परिषद स्तरावर हा विषय पुढील सभेत मांडण्यात येणार असल्याचे समजते. त्यामुळे या मागणीबाबत प्रशासन कोणता निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

---------------------------------------

त्याने आपले नाव अंतिम यादीत कोरले.आई-वडिलांच्या कष्टाचे चीज सुशीलच्या या यशामागे त्याच्या आई-वडिलांचा मोलाचा वाटा आहे. आपल्या मुलाने शिकावे आणि मोठे व्हावे यासाठी वडिलांनी मजुरी करून त्याला पाठबळ दिले, तर आईने त्याला सदैव प्रोत्साहन दिले. "आज माझ्या मुलाने माझ्या कष्टाचे चीज केले," अशी भावना व्यक्त करताना सुशीलच्या वडिलांचे डोळे पाणावले होते.सुशीलच्या या निवडीमुळे चिंचगव्हाण गावात आनंदाचे वातावरण असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर त्याने एक नवीन आदर्श उभा केला आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन केले जात आहे.

---------------------------------------



हॅलो बीड

परळी संघर्षनेता

शनिवार दि. 28 मार्च 2026



# माझ्या कातड्याचे जोडे केले तरी तुमचे प्रेम फेडू शकणार नाही

## भायाळाच्या नारळी सप्ताहात ना. पंकजाताई मुंडेंनी पदराने काढली जनतेच्या प्रेमाची दृष्ट





पाटोदा दि. 27--

गोपीनाथ मुंडे हे नाव जगाला विसरु देणार नाही, मी ही शपथ चितेवर खाल्ली आहे. गोपीनाथ मुंडे या नावाच्या संस्कारावर तुमचा किती विश्वास आहे. तुम्ही किती रे प्रेम करता माझ्यावर.. याची कशी परतफेड करू. माझ्या कातड्याचे जोडे करून तुमच्या पायात घातले तरी ही फेड होणार नाही, अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी भायाळा येथे आपल्या भावना व्यक्त केल्या.

भायाळा येथे आयोजित करण्यात आलेल्या महामंडलेश्वर त्रिवेंद्रानंद सरस्वती महाराज गणेशानंद गडाच्या नारळी सप्ताह आणि नामजप यज्ञ सोहळ्यास ना. पंकजाताई मुंडे काल संध्याकाळी भेट दिली, त्यावेळी त्या बोलत होत्या. ह.भ.प. राधाताई सानप, गणेशानंद गडाचे मठाधिपती विक्रमानंद पान 3 वर

# मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या हा 'चिंतेचा' नाही तर 'चिंतनाचा' विषय; खासदार रजनीताई पाटील यांनी राज्यसभेत सरकारला झापले

● हैदराबादच्या धर्तीवर मराठवाड्यात 'क्रीडा' (CRIDA) प्रादेशिक केंद्र स्थापन करण्याची आग्रही मागणी

प्रकाश मुंडे | केज तालुका प्रतिनिधी




"कृषीप्रधान देशात अन्नदाता शेतकरी आत्महत्या करतो, ही अत्यंत गंभीर आणि क्लेशदायक बाब आहे. सरकार आकडेवारीचा खेळ करून आत्महत्या कमी झाल्याचा दावा करत असले, तरी वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे. मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी आज ओला दुष्काळ, अतिवृष्टी आणि नापिकीच्या दुष्टचक्रात पूर्णपणे भरडला गेला आहे," अशा शब्दांत खासदार रजनीताई पाटील यांनी राज्यसभेत सरकारवर तोफ डागली.

मराठवाड्यातील वाढत्या शेतकरी आत्महत्या आणि शेतीपुढील संकटांकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी राज्यसभेत विशेष आवाज उठवला.

सरकारचा दावा फोल; ग्राऊंड रिॲलिटी भीषण

खा. पाटील पुढे म्हणाल्या की, हवामान बदल आणि अनियमित पावसामुळे कोरडवाहू शेती पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. "सरकार सांगते आत्महत्या कमी झाल्या, पण प्रत्यक्षात शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहे. मराठवाडा सतत कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी अशा दोन पान 3 वर

# युवा नेते रणजित आडसकर यांनी केज नगरपंचायत निवडणुकीसाठी रणसिंग फुंकले !

## नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवणार

प्रकाश मुंडे | विशेष प्रतिनिधी

येणाऱ्या वर्षात होऊ घातलेल्या केज नगरपंचायत निवडणुकीचे वेध आतापासूनच शहरवासीयांना लागले आहेत. या निवडणुकीत सर्वात मोठी आणि महत्त्वाची घडामोड म्हणजे युवा नेते रणजित आडसकर यांचा होणारा दमदार प्रवेश. स्व. बाबुरावजी आडसकर यांचे नातू आणि ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर यांचे चिरंजीव असलेल्या रणजित आडसकर यांच्या सक्रियतेमुळे केजच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



आडसकरांच्या एन्ट्रीने वातावरणात उष्णता रणजित आडसकर यांनी केज शहराच्या राजकारणात उतरण्याचे निश्चित केल्याने प्रस्थापित गटांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. अभ्यासू व्यक्तिमत्व आणि वारसा लाभलेले नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. आता उत्सुकता केवळ एकाच गोष्टीची आहे की, रणजित आडसकर स्वतः नगराध्यक्षपदासाठी मैदानात उतरणार की नगरसेवक म्हणून निवडणूक लढवून किंगमेकरची भूमिका बजावणार? या प्रश्नाचे उत्तर लवकरच मिळणार असले तरी, त्यांच्या आगमनाने पान 3 वर

# विद्यार्थ्यांनी केवळ भूमिका निभावल्या नाहीत, तर भविष्यातील जबाबदारीची जाणीव मनापासून अनुभवली — श्री. दीपक तांदळे

## संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभागात इयत्ता सातवीचा स्वयंशासन दिन शिस्त, जबाबदारी आणि नेतृत्वाचा आदर्श ठरला!









परळी (वार्ताहर) : शहरातील श्री पद्मावती शिक्षण संस्था संचलित संस्कार प्राथमिक शाळा, विद्यानगर विभाग येथे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी साजरा केलेला 'स्वयंशासन दिन' हा केवळ एक उपक्रम न राहता विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय आणि प्रेरणादायी अनुभव ठरला. या दिवशी प्रत्येक विद्यार्थ्याच्या डोळ्यात आत्मविश्वासाची चमक, मनात जबाबदारीची जाणीव आणि कृतीत नेतृत्वाची ताकद स्पष्टपणे दिसून आली.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. या क्षणी विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षकांविषयी आदर आणि प्रेरणेची भावना अधिक दृढ झाली.



या विशेष दिवशी शाळेचे संपूर्ण प्रशासन विद्यार्थ्यांच्या हाती सोपवण्यात आले होते. मुख्याध्यापिका म्हणून कु. जान्हवी कटारे, उपमुख्याध्यापक म्हणून चि. शिवराज शिंदे पान 3 वर

# नामस्मरण, सद्विचार आणि सुसंस्कार हेच खरे रामराज्य — लिंबाजी महाराज तिडके

## धर्मापुरीत प्रतिपादन ; अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) : माणसाने काळानुसार बदलले पाहिजे, परंतु आपल्या संस्कृतीची व अध्यात्माची कास सोडू नये. कीर्तन हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून मन शुद्ध करण्याचा आणि जीवनाला योग्य दिशा देण्याचा प्रभावी मार्ग आहे. नामस्मरण, शुद्ध विचार आणि सुसंस्कार यांमुळेच खऱ्या अर्थाने 'रामराज्य' प्रत्येकाच्या जीवनात निर्माण होऊ शकते," असे प्रतिपादन ह.भ.प. लिंबाजी महाराज तिडके यांनी धर्मापुरी येथील श्री क्षेत्र रोकडेश्वर देवस्थानद्वारा आयोजित अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ तथा हनुमान चालीसा पारायण सोहळ्यानिमित्त आयोजित कीर्तन महोत्सवात केले.

"झाले रामराज्य काय उणे आम्हासी, धरती धरी पिके ओसंडती गाई म्हशी" या संतवाणीतील अभंगावर प्रतिपादन करताना महाराजांनी रामराज्याची व्यापक संकल्पना पान 3 वर

# धम्मदीप बुद्ध विहार येथे प्रियदर्शी सम्राट अशोक जयंती उत्साहात संपन्न.

## माया दिवाण व बौद्धाचार्य भास्कर सोनवणे यांचा सत्कार



बीड (प्रतिनिधी) युद्धात निपुण असलेल्या प्रियदर्शी सम्राट अशोकाने तलवारीच्या जोरावर जवळपास चक्रवर्ती सम्राट पद मिळवले होते. परंतु कलिंगा युद्धातील नरसंहार बघून त्यांनी तलवारीचा त्याग करून तथागतांच्या प्रज्ञा, शिल,करुणा मैत्री,समता, शांती व मानवाच्या कल्याणाचा पंचशील व अत:दीप भव आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला शरण जाऊन व तसे आचरण करून जगात लोककल्याणकारी सम्राट म्हणून कार्य केले. त्यांचा आदर्श समोर ठेवून जगाला युद्ध नको, तर बुद्ध विचारांची गरज आहे असे प्रतिपादन प्राध्यापक डॉ.नामदेव शिनगारे यांनी केले. महामानव अभिवादन ग्रुप व धम्मदीप बुद्ध विहार बलभीम नगर पालवण रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांच्या जयंतीदिनी अभिवादन कार्यक्रमाच्याप्रसंगी अध्यक्षपदी प्रा. डॉ. नामदेव पान 3 वर

# उजनीचे पाणी मांजरा धरणात आणा; खा.बजरंग सोनवणेंनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केंद्राचे वेधले लक्ष

● संसदेत उठविला आवाज, शेतकऱ्यांना वेळेत मदत देण्याचीही मागणी




नवी दिल्ली: मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी आणि बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्यांसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी दि.27 मार्च रोजी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवाज उठवला. सोलापूरच्या उजनी धरणातून मांजरा नदीमार्गे मांजरा धरणात पाणी आणण्याचा प्रकल्प त्वरित मार्गी लावावा, अशी आग्रही मागणी करत त्यांनी बीडच्या दुष्काळी परिस्थितीकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

दिल्लीत सुरु असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीडचे खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी दुष्काळ आणि अस्मानी संकटाबाबत खा.सोनवणे यांनी आपल्या भाषणात बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. ते म्हणाले की, बीडचा शेतकरी दरवर्षी दुष्काळाच्या झळा सोसतोय. यावर्षी त्यात वादळ, अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाची भर पडली आहे. निसर्गाच्या या लहरीपणामुळे कष्टाचे पीक पान 3 वर

# भरधाव हायवाच्या धडकेने कार पेटली, वेळीच बाहेर पडता न आल्याने मायलेकाचा होरपळून मृत्यू



कडा : बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावर शुक्रवारी सकाळी 10:30 वाजेच्या सुमारास एक काळीज पिळवटून टाकणारी घटना घडली. खडीने भरलेल्या भरधाव हायवाने कारला समोरासमोर जोरदार धडक दिली. या भीषण धडकेमुळे कारने अचानक पेट घेतला आणि त्यामध्ये असलेल्या दोघांचा वेळीच बाहेर पडता न आल्याने होरपळून जागीच मृत्यू झाला. दोघेही नात्याने मुलगा आणि आई असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अंबाजोगाई तालुक्यातील एक दांपत्य आपल्या कारमधून बीडच्या दिशेने जात होते. याच वेळी बीडकडून डोईठाणकडे खडी घेऊन जाणाऱ्या एका भरधाव हायवाने कापशी गावाजवळ पान 3 वर

# लोकमान्य टिळक महाविद्यालयात सायबर सुरक्षा जाणीव-जागृती कार्यशाळा संपन्न

वडवणी | प्रतिनिधी

येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयात संगणक शास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने "सायबर सुरक्षा जाणीव-जागृती" या विषयावर दि. 27 मार्च 2026 रोजी कार्यशाळा उत्साहात पार पडली.




या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी क्रीडा विभाग प्रमुख डॉ. महेश राजे निंबाळकर होते. प्रमुख व्याख्याते म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचे प्रा. भार्गव राम योगेश्वर चौधरी तर प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भालचंद्र (बी. जी.) कुलकर्णी व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. डॉ. संजय साळुंखे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. यानंतर विज्ञान पान 3 वर

# परळीत सोमवारी मांस विक्री बंदीची मागणी; केदारी यांचे प्रशासनाला निवेदन

परळी (वार्ताहर) बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे प्रत्येक सोमवारी मांस विक्री व सेवनावर कडक बंदी लागू करण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते *श्री. शिवकुमार केदारी (हिंद नगर, परळी वैजनाथ*) यांनी प्रशासनाकडे सविस्तर निवेदन सादर केले आहे.

परळी वैजनाथ हे भारतातील 12 ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र धार्मिक स्थळ असून, येथे दर सोमवारी हजारो भाविक प्रभू वैद्यनाथ भगवान यांच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. त्यामुळे त्या दिवशी शहरात भक्तिमय, सात्विक व धार्मिक वातावरण निर्माण होत असते. मात्र, अशा पवित्र दिवशीही शहरात मांस विक्री सुरू असल्याने भाविकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.



याबाबत श्री. केदारी यांनी प्रत्यक्ष नगर पान 3 वर

# पंचशील नगरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अध्यक्ष पदी गोटु लांडगे तर सचिव पदी मनोज फुलवरे

## नगरसेवक सचिन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार जंयती उत्सव .

माजलगांव ( अनंत घडसिंगे ) :



शहरातील पंचशील नगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. माजलगाव नगर परिषदेचे नगरसेवक सचिन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतीच नियोजन बैठक पार पडली.या बैठकीत जयंती उत्सवाची सविस्तर तयारी आणि नियोजन करण्यात आले. तसेच जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी एकमताने निवडण्यात आली. कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी गोटू लांडगे, उपाध्यक्षपदी स्वप्नील टाकणखार आणि सचिवपदी मनोज फुलवरे यांची निवड करण्यात आली. पान 3 वर

# जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मजुराचा मुलगा झाला 'रेल्वे पायलट'

● चिंचगव्हाणच्या सुशील चंदनशिवचे भारतीय रेल्वेत मोठे यश; गावच्या शिरपेचात मानाचा तुरा



माजलगाव ( अनंत घडसिंगे ) :

" कष्ट करण्याची तयारी आणि मनात जिद्द असेल तर परिस्थितीवर मात करून यशाचे शिखर गाठता येते," हे माजलगाव तालुक्यातील चिंचगव्हाण येथील सुशील सुभाषराव चंदनशिव याने सिद्ध करून दाखवले आहे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सुशीलची भारतीय रेल्वेमध्ये असिस्टंट लोको पायलट (ALP) पदी निवड झाली असून, त्याच्या या यशाने संपूर्ण जिल्ह्यातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

*संघर्षातून इंजिनिअरिंगचा प्रवास*

सुशीलचे वडील सुभाषराव चंदनशिव हे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. घरात अत्यंत बेताची परिस्थिती असतानाही त्यांनी सुशीलच्या शिक्षणात कोणतीही कमतरता भासू दिली नाही. सुशीलने देखील वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत आपले इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले.

अशी होती परीक्षेची वाटचाल

सुशीलने 2024 मध्ये रेल्वे भरतीची परीक्षा दिली होती. ही परीक्षा अत्यंत कठीण टप्प्यातून पार पडली:

पूर्व परीक्षा (CBT-1):* यामध्ये त्याने घवघवीत यश मिळवले.मुख्य परीक्षा (CBT-2):* तांत्रिक विषयांच्या या परीक्षेतही त्याने आपली चमक दाखवली.बौद्धिक चाचणी (Aptitude Test):* शेवटच्या आणि अत्यंत महत्त्वाच्या अशा सायको टेस्टमध्ये यशस्वी होऊन पान 3 वर